ठाणे, सोमवार दि. २ सप्टेंबर २०२४ वर्ष : १३, अंक : १२६ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**शाब्दिक आरोप**

देवेंद्र फडणवीसांनी काँग्रेसवर दोषारोप करत काँग्रेसने माफी मागण्याबाबत आव्हान दिले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा मालवणमध्ये कोसळल्यानंतर महायुतीवर महा विकास आघाडीच्या नेत्यांनी काही आरोप....

...पान २ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

कमाल ३६° से | किमान २९° से

**बाजार**

सोने ७३,२८० | चांदी ९३,६८०

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



या या! तुमच्यासारख्या स्टार हिरॉईन आमच्या पक्षात आल्या आहेत तर भाग्यच उजळणार आमचं आणि जनतेचंही!

# मविआचं जोडे मारो आंदोलन

## चुकीच्या गोष्टींना प्रोत्साहित करता, अंगाशी आलं की माफी मागता, शिवाजी महाराज आणि सावरकरांची तुलना होऊ शकते का? शरद पवारांचा पीएम मोदींना सवाल







**मुंबई: पोलिसांच्या परवानगीची पर्वा न करता महाविकास आघाडीचं जोडे मारो आंदोलन केले आहे. गेट वे ऑफ इंडियावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंची सरकारवर कडाडून टीका केली आहे. या मोर्चामध्ये खासदार शाहू महाराज, सुप्रिया सुळेंसह मविआचे अनेक नेते सहभागी झाले होते.. हुतात्मा चौकातून मविआनं रॅली काढली यानंतर गेट वे ऑफ इंडियाला मविआची सभा पार पडली.**

### कोसळलेला पुतळा भ्रष्टाचाराचा नमुना–पवार

महाराष्ट्राच्या इतिहासात छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करण्याची भूमिका राज्यकर्त्यांनी केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वाऱ्यामुळे शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याचे धक्कादायक विधान केले. राज्यभरात असलेले शिवाजी महाराजांचे पुतळे लोकांना प्रेरणा देत असतात. परंतु मालवणमध्ये उभा केलेला पुतळा भ्रष्टाचाराचा नमुना आहे. तो पुतळा उभारण्यात भ्रष्टाचार झाला आहे, हा जनमानसात समज निर्माण झाला आहे. हा शिवप्रेमी लोकांचा अपमान करण्यात आला. त्यामुळे आम्ही सरकारचा निषेध करण्याची भूमिका घेतली, असे शरद पवार यांनी म्हटले.

पुतळा कोसळला आणि सांगितलं जात पंतप्रधान मोदी यांनी माफी मागितली. त्यांनी माफी मागितली आणि लगेच सांगितलं की सावरकरांवर टीका टिप्पणी केली जाते. त्यांनी कधी माफी मागितली नाही. शिवाजी महाराजांचा पुतळा पडला. विषय काय? लोकांची अस्वस्था काय? आता विषय काय आहे आणि हे बोलतं आहेत. आता शिवाजी महाराज आणि सावरकर यांची तुलना होऊ शकते? ज्यांनी रयतेच राज्य आणल त्यांची तुलना कशा प्रकारे देशाचे पंतप्रधान करतात हे आपण पाहिलं. याचा अर्थ असा की चुकीच्या गोष्टी आणि चुकीच्या विचारांना प्रोत्साहित करता. अंगाशी आलं की माफी मागून सुटका करण्याचा प्रयत्न करता, असं राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार म्हणाले. ते मुंबईत बोलत होते.

### हा अपमान महाराष्ट्राचा आहे आणि याला कधीच माफी नाही–ठाकरे

- शिवद्रोह्यांना गेट आऊट करा–ठाकरे
- ठाकरेंनाच २ वर्षापूर्वी जनतेने गेट आऊट केले– शिंदे
- शिवाजी महाराजांनी सूरत लुटली नव्हती, केवळ...; फडणवीस

(सविस्तर वृत्त पान २)

### मुख्यमंत्री शिंदेंची पहिली प्रतिक्रिया



विरोधक दंगलीच्या भाषा करत होते. त्यांना महाराष्ट्र अशांत करायचा आहे. त्यांना महाराष्ट्र शांत नकोय. महाराष्ट्रात दंगली व्हाव्यात जातीजातीत तेढ व्हावी असा प्रयत्न त्यांनी लोकसभेपूर्वीही केला होता. पण राज्यातील जनता संयमी आहे, सूज्ञ आहे म्हणून राज्य सरकारही कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी काम करत आहे. विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. त्यांना पराभव दिसत आहे. लोकसभेत खोटं नरेटिव्ह पसरवून आरक्षण जाणार, संविधान बदलणा हे होणार ते होणार सांगून लोकांमध्ये भीती पसरवून मते मिळवली. पण माणूस एकदा फसतो. पुन्हा पुन्हा फसत नाही, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. **(पान २ वर)**

### मविआच्या आंदोलनाला भाजपचे आंदोलनाने प्रत्युत्तर



(छाया - मनोज सिंह)

राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यानंतर महाविकास आघाडीनं आज मुंबईत जोडे मारो आंदोलन केलं. त्याला प्रत्युत्तर म्हणून भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी महाविकास आघाडीच्या विरोधात निदर्शनं केलीत. यावेळी मविआच्या नेत्यांच्या विरोधात फलक हातात पकडून घोषणाबाजी करण्यात आली. तर, अनेक ठिकाणी हे आंदोलन छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोरच करण्यात आलं आहे.

भारतीय जनता युवा मोर्चा ठाणे शहर तर्फे छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने जे महाविकास आघाडीचे घाणेरडे राजकारण सुरू आहे त्याचा निषेधात आंदोलन ठाण्याच्या ऐतिहासिक तलावपाली ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पवित्र पुतळ्यास मानवंदना देऊन करण्यात आले भाजपा जिल्हाध्यक्ष संजय वाघुलेजी यांच्या मार्गदर्शनात व युवा जिल्हाध्यक्ष सूरज दळवी यांच्या युवा नेतृत्वात करण्यात आले यावेळी ठाणे शहर आमदार संजय केळकरजी यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच त्यांचासह नगरसेवक मनोहर डुंबरे, नगरसेविका प्रतिभा मढवी, भाजप जिल्हा सरचिटणीस मनोहर सुखदरेजी, सचिन पाटीलजी, जिल्हा उपाध्यक्ष राजेश मढवीजी, चिटणीस श्रुतिका कोंगणोळीकर, नौपाडा महिला मोर्चा अध्यक्षा वृशाली वाघुले, सुषमा ठाकूर, शिंदे श्रुती महाजन तसेच ज्येष्ठ पदाधिकारी यावेळी आंदोलन युवा मोर्चा शहर व जिल्हा मंडल पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.

**थोडक्यात घडामोडी**

### व्यावसायिक गॅस सिलेंडर ३९ रुपयांनी माहाग

नवी दिल्ली : ऑगस्ट संपून आता सप्टेंबर सुरु होत असतानाच महिन्याच्या पहिल्याच दिवशी केंद्र सरकारने एलपीजी ग्राहकांना मोठा झटका दिला आहे. त्यात आता तेल कंपन्यांनी १९ किलो वजनाच्या व्यावसायिक गॅस सिलिंडरची किंमत ३९ रुपयांनी वाढवली आहे. त्यामुळे ग्राहकांच्या खिशाला कात्री लागणार आहे. व्यावसायिक सिलेंडरचे दर जरी वाढले असले तरी घरगुती वापराच्या एलपीजी सिलेंडरच्या दरात कोणतीही वाढ अथवा कपात केली नसल्याचे सांगण्यात आले आहे.

१ सप्टेंबर २०२४ रोजी तेल विपणन कंपन्यांनी १९ किलोच्या व्यावसायिक गॅस सिलिंडरची किंमत ३९ रुपयांनी वाढवली आहे. कंपन्यांनी १४.२ किलोच्या घरगुती सिलिंडरच्या किमतीत कोणताही बदल केलेला नाही, मात्र, १९ किलोचा व्यावसायिक सिलिंडर महाग झाला आहे. IOCL च्या वेबसाइटनुसार, हे दर आज, १ सप्टेंबर २०२४ पासून लागू झाले आहेत. एलपीजी सिलिंडरच्या किमती प्रत्येक महिन्याच्या पहिल्या दिवशी निश्चित केल्या जातात. तेल विपणन कंपन्यांनी आजपासून १९ किलोच्या व्यावसायिक सिलेंडरच्या किंमतीत ३९ रुपयांनी वाढ केली आहे.

### महायुतीचा इतक्या जागांवर 'फॉर्म्युला' ठरला!– सूत्र

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीकडून जागावाटपावर चर्चा करण्यासाठी दुसरी फेरी काल (३१ ऑगस्ट) पार पडली. राष्ट्रवादीच्या सूत्रांनी एएनआयला दिलेल्या माहितीनुसार ३ तास चाललेल्या या बैठकीत महाराष्ट्रातील २८८ पैकी १७३ जागांवर एकमत झालं आहे. या बैठकीत भाजपला जास्तीत जास्त जागा देण्याचा निर्णय घेण्यात आला. भाजपनंतर शिवसेना आणि राष्ट्रवादीला जागा मिळतील. मात्र, कोणत्या पक्षाला किती जागा देण्याचे मान्य झाले, याची माहिती समोर आलेली नाही. पुढील बैठकीत उर्वरित ११५ जागांवर निर्णय होणार आहे.

# ठाणे खरंच खूप बदलतं आहे, ठाण्याचा विकास झपाट्याने होत आहे

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ठाणे महापालिका क्षेत्रातील विविध प्रकल्पांचे लोकार्पण आणि भूमीपूजन संपन्न













ठाणे - आजचा दिवस इतिहासात सूवर्णाक्षरांनी लिहिण्यासारखा आहे. एकाच इमारतीत १२ राज्यातील १२ समाजासाठी जागा दिली जात असून अशा प्रकारचे समाज भवन प्रथमच साकारले जात आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कासार वडवली येथील समाज भवनाच्या भूमीपूजन समारंभात केले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज ठाणे महापालिका क्षेत्रातील, ओवळा-माजिवडा भागातील आमदार प्रताप सरनाईक यांच्या प्रयत्नांनी साकारलेल्या विविध प्रकल्पांचे लोकार्पण आणि भूमीपूजन संपन्न झाले. याप्रसंगी खासदार नरेश म्हस्के, आमदार प्रताप सरनाईक, माजी आमदार रविंद्र फाटक, माजी महापौर अशोक वैती, माजी ज्येष्ठ नगरसेवक राम रेपाळे, परिषा सरनाईक, ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा आदी मान्यवर उपस्थित होते.नागला बंदर येथे सर्वात मोठी चौपाटी विकसित झाली आहे. एका बाजूला डोंगर, मध्ये खाडी, **(पान २ वर)**

### भूमीपूजन

१ 'महापालिकाक्षेत्रातील मुलभूत सोयी सुविधांचा विकास योजने'अंतर्गत, नागला बंदर येथील खाडीकिनारा विकसित करून आरमार केंद्राची प्रतिकृती उभारण्यात येणार आहे. त्यासाठी सुमारे १५० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

२ वर्तकनगर प्रभाग समिती क्षेत्रात समता नगर, राजीव गांधी नगर आणि सिद्धिविनायक नगर या तिन्ही सुविधा भूखंडांवरील अस्तित्वात असलेल्या पुनर्वसित वसाहतींचा खाजगी लोकसहभागातून पुनर्विकास होणार आहे. तेथील ३५३ झोपडपट्टीधारकांचे सहा इमारतींमध्ये पुनर्वसन करण्यात येणार आहे. सोबत नाना-नानी पार्क, लहान मुलांना खेळण्यासाठी जागा, पार्किंगची व्यवस्था आदी सुविधा देण्यात येणार आहेत. या खर्च सुमारे १५० कोटींच्या घरात आहे.

३ वसंतविहार येथे चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण केंद्र व वसतिगृह बांधण्यात येणार आहे. त्यासाठी २५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

४ शिवाईनगर येथील राखीव भूखंडावर स्व. सुधाकर वामन चव्हाण बहुउद्देशीय इमारत बांधण्यात येणार आहे. त्यासाठी २५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

५ कासारवडवली येथे सुविधा भूखंडावर विविध समाजांच्या भवनांची इमारत बांधण्यात येणार आहे. त्यासाठी ११ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

### लोकार्पण – हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे चौपाटी, गायमुख – टप्पा २

केंद्र आणि राज्य सरकार, ठाणे महानगरपालिका, ठाणे स्मार्ट सिटी लि. यांच्या संयुक्त विद्यमाने नागला बंदर खाडीलगत हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे चौपाटी, गायमुख टप्पा २ तयार करण्यात आला आहे. स्मार्ट सिटीच्या कामांच्या अंतर्गत येथे सुमारे ८०० मीटरची लांबी असलेल्या या चौपाटीवर जेट्टी, गणेश विसर्जन घाट, दशक्रिया विधी घाट, खाडीलगत पादचाऱ्यांसाठी पदपथ, रस्त्यालगत पदपथ, मियावाकी उद्यान, आसन व्यवस्था, ॲम्फी थिएटर, वाहन पार्किंग व्यवस्था, प्रसाधनगृहे, विद्युत रोषणाई आणि सीसीटीव्ही आदी सुविधा देण्यात आल्या आहेत. त्यासाठी सुमारे ४५ कोटी रुपयांचा खर्च आला आहे.

### लोकार्पण – डॉ. सिंधुताई सपकाळ तिरंदाजी केंद्र

ठाणे महापालिकेतर्फे वर्तकनगर खेळाचे मैदान या आरक्षित भूखंडावर बांधकाम टीडीआरमार्फत डॉ. सिंधूताई सपकाळ तिरंदाजी प्रशिक्षण केंद्र बांधण्यात आले आहे. येथे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या तिरंदाजीसाठी व्यवस्था करण्यात आली आहे. यासाठी सुमारे साडेचार कोटी रुपये खर्च आला आहे.



गणेशोत्सव अवघ्या काही दिवसावर आलेला असताना सार्वजनिक मंडळांनी आपल्या मंडपात श्रीं गणेशाची मूर्ती घेऊन जाण्यास सुरुवात केली आहे ठाण्यातील वृंदावन सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची १८ फुटाची बाप्पाची मूर्ती शनिवारी दाखल झाली तेव्हाचे छायाचित्र..



ठाणे येथे गणपती निमित्त मुख्य बाजार पेठेत गणपती आरास पूजेचे साहित्य घेण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली आहे. (छाया - मनोज सिंह)

# जनकल्याण स्मार्ट कार्ड चे आ. संजय केळकर यांच्या पुढाकाराने हजारो महिलांना वाटप...

**सरकारच्या विविध शासकिय योजनांमधून महिलांच्या सक्षमीकरणाचे कार्य होत असताना ठाणे शहराचे आमदार संजय केळकर यांच्या पुढाकाराने महिला विकास परिवार या सामाजिक संस्थेच्यावतीने महिलांना जनकल्याण स्मार्ट कार्ड चे वाटप आ. केळकर यांच्या हस्ते रविवारी भगवती शाळेच्या मैदानात वाटप करण्यात आले. महिलांना संसाराचा गाडा हाकण्यासाठी या मोफत जनकल्याण डिस्काऊंट कार्डचा हातभार लागणार आहे.**





ठाणे - जनसेवक आमदार संजय केळकर यांच्या पुढाकाराने ठाणे शहरातील सर्व महिला भगिनी सदस्यांना देण्यात आलेल्या या जनकल्याण कार्डच्या माध्यमातून महिला भगिनी स्वतःसाठी किंवा आपल्या कुटुंबासाठी दिलेल्या दुकानांच्या यादीमधून ज्या दुकानात खरेदी करतील तिथे त्यांना १५ ते ५० टक्क्यांपर्यंत विशेष सूट मिळणार आहे.

या आस्थापनांच्या यादीत साड्यांची नऊ, ड्रेस मटेरियल १८, मेन्स वेअर १२, किड्स वेअर तीन, स्टील व क्रॉकरी नऊ, ज्वेलरी घडणावळ आठ कॉस्मेटिक इमिटेशन सहा, फुटवेअर तीन, मोबाईल, आयटी स्टेशनरी तीन, पर्सेस-बॅग्स तीन, फर्निचर तीन, खेळणी युनिफॉर्म आणि मेडीकल स्टोअर प्रत्येकी एक अशा ८०हून अधिक दुकानांचा समावेश आहे. ठाणे शहरातील सर्व घटकातील गरजू महिलांना हे कार्ड वर्षभर वापरता येणार आहे तसेच त्याचे नंतर नूतनीकरणही करता येणार आहे.

यावेळी भाषणात बोलताना आमदार संजय केळकर म्हणाले, मतांसाठी प्रासंगिक नाही तर सुरक्षा, सुविधा, सेवा आणि स्वयंरोजगार या चतु:सुत्रीवर मी वर्षभर महिला भगिनींच्या कल्याणासाठी विविध उपक्रम राबवत आहे. या उपक्रमांच्या माध्यमातून मुलींना ऑनलाइन शिक्षणासाठी मोफत क्लाउड प उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्याचा लाभ सुमारे अडीच हजार मुलींनी घेतला आहे. १०० गरीब-गरजू मुलींना मोफत अँड्रॉइड मोबाईल देण्यात आले. ७५० मुलींना स्वसंरक्षणाचे धडे देण्यात आले. दीड हजार मुलींना कॉम्प्युटर प्रशिक्षण **(पान २ वर)**

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## शाब्दिक आरोप

देवेंद्र फडणवीसांनी काँग्रेसवर दोषारोप करत काँग्रेसने माफी मागण्याबाबत आव्हान दिले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा मालवणमध्ये कोसळल्यानंतर महायुतीवर महा विकास आघाडीच्या नेत्यांनी काही आरोप केले आहेत. त्याला प्रत्युत्तर देताना फडणवीसांनी म्हटले आहे की, आम्हाला काँग्रेसने इतिहासात शिकवले आहे की, शिवाजी महाराजांनी सूरत लुटली. पण, महाराजांनी सूरत लुटली नव्हती, महाराजांनी केवळ स्वराज्याचा खजिना योग्य त्या लोकांकडून घेतला होता, किंवा त्यांच्यावर आक्रमण केले होते. पण, सूरत कधी लुटली नव्हती, जणू काही सर्वसामान्य लोकांची लूट करायला महाराज गेले अशा प्रकारचा इतिहास काँग्रेसने आम्हाला इतकी वर्ष शिकवला, त्याला माफी मागायला सांगणार आहात का? असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले होते. याबाबत आता शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी फडणवीसांना आव्हान दिले आहे. आरोप – प्रत्यारोपांचा खेळ महा विकास आघाडी आणि महायुतीच्या नेत्यांमध्ये अशा प्रकारे रंगला आहे. परंतु या वादात छत्रपती शिवाजी महाराजांची बदनामी होत असून घाणेरडी चर्चा किंवा वाद थांबले पाहिजेत असे वाटते.

जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले आहे की, देवेंद्र फडणवीस साहेबांनी कहर केला. महाराजांनी सुरत लुटली नाही, सुरत लुटली नाही फक्त छावणी लुटली, असे फडणवीस ययांचे मत आहे. मी त्यांना आव्हान देतो की, बर्नियर नावाचे इतिहासकार होते त्यांनी हे लिहून ठेवले आहे. त्याकाळी सुरत हे व्यापाराचे ठिकाण होते. त्यांनी महाराजांच्या विरोधातल्या लढाईत सुरतमधून मदत गेली हा राग होता. हा आमचा अभिमान आहे. फडणवीस म्हणतात, हे सर्व काँग्रेसने केले आहे. इतिहासकरांना काँग्रेस पक्ष सांगायला गेला होता का? महाराज छावणी लुटायला गेलेले असे म्हणतात पण तसे नाही. महाराज स्वराज्य घडवायला जन्माला आले होते. तुम्ही महाराजांना लहान करत आहात. महाराजांचे शौर्य कमी करण्याचा प्रयत्न करत आहात. आव्हाड यांनी फडणवीसांच्या वक्तव्यावर टिप्पणी केली आहे. ही टिप्पणी करताना फडणवीसांच्या वक्तव्यातील मतितार्थ आव्हाड यांनी उघड केला आहे.

देवेंद्र फडणवीस छत्रपती शिवाजी महाराजांच्या निमित्ताने काँग्रेसला दोष देत आहेत,असे दिसते. काँग्रेसने छत्रपती शिवरायांची बदनामी केली असा फडणवीसांच्या बोलण्याचा रोख दिसतो. विषय एकाचा आणि त्या विषयाच्या निमित्ताने बदनामी दुसऱ्याची ही फडणविशी नीती आहे. काँग्रेसने असे इतिहासात शिकवले असे फडणवीस म्हणतात. परंतु इतिहासकारांनी असे म्हटले, असे फडणवीस म्हणत नाहीत, याचे आश्चर्य वाटते. महाराष्ट्रात शिवरायांचा पुतळा सरकारच्या निष्काळजीपणामुळे कोसळला हे मान्य न करता फडणवीस काँग्रेसला या वादात ओढू पाहतात. जितेंद्र आव्हाड यांनी फडणाविसाना उत्तर देताना म्हटले आहे की, महाराष्ट्रामध्ये निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत, पण महाराष्ट्र अस्वस्थ आहे. त्यात मराठी माणसाला अतिशय दुःख झाले. मालवणला शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला. जगात अनेक पुतळे आहेत, अनेक वर्षा पूर्वीचा स्टॅचू ऑफ लिबर्टी, शाहू महाराज यांनी केलेला पुतळा गेट वे ऑफ इंडियाचा पुतळा आहे. कोणतेच पडले नाहीत. मालवणमध्ये आपटे यांनी पुतळा केला, पण एवढ्या लवकर पुतळा कसा असा झाला. ह्या ठिकाणी वादळ आले असल्याचे सांगितले गेले. त्यात नारळ आणि सुपारी सुद्धा पडत नाही. ज्याने मातीचा पुतळा कधी बनवला नाही , तो आपटे महाराजांचा पुतळा बनवतो. आपटे फरार आहे, हे फरार सरकार आहे. मध्यंतरी विशाळगडावर आक्रमण झाले. मशीद पाडली, त्यावर हल्ला केला. महाराजांनी सांगितले कोणताही धर्म आणि जात असा भेदभाव करायचा नाही. आव्हाड यांच्या बोलण्यातून छत्रपती शिवरायांच्या सर्वधर्म समभावाची नीती उघड होते.

राज्यात शिवाजी महाराजांच्या निमित्ताने दोन्ही नेत्यांमध्ये आरोप – प्रत्यारोप सुरू आहेत. असे प्रकार वारंवार घडत आहेत. या वादात फडणवीस काँग्रेसला ओढू पाहतात, हे योग्य नाही. आपली चूक दडविण्यासाठी दुसरा विषय काढायचा, ही फडणवीसांची पद्धत योग्य नाही. यामुळे विषय भरकटवणे हा उद्देश्य फडणवीसांचा दिसत आहे. फडणवीसांच्या बोलण्यात काही तथ्य नाही हेही दिसते. काँग्रेसने आम्हाला हे शिकवले असे फडणवीस म्हणतात, त्यावेळी इतिहासकारांनी असे म्हटले होते, हे फडणवीस हेतुपुरस्सर म्हणत नाहीत. फडणवीस हुशार असले तरी ते इतिहास समजून न घेता काँग्रेसवर दोषारोप करण्यासाठी त्यांची बुद्धी वापरत आहेत असेच दिसते.

बदलापूर मधील घटना घडली त्यावेळी पोलीस केस घेत नव्हते. नंतर जनप्रक्षोभ झाला आणि केस घेतली. असे सरकार आहे. कुठे चालला आहे हा महाराष्ट्र ? असा सवालही आव्हाड यांनी विचारला आहे. आपटेला आणि शाळेला वाचवायचा प्रयत्न राज्य सरकार करत असल्याचा आरोप आव्हाड यांनी केला आहे. बदलापूरमध्ये शिवाजी महाराज यांचे चरण लागले आहेत. त्या ठिकाणी महाराज घोडे बदलायचे. त्या ठिकाणी असे घडत असल्याची खंत आव्हाड यांनी व्यक्त केली आहे. तअसेच राज्य सरकारने आंदोलन करायला आलेल्या ३०० लोकांवर गुन्हा दाखल केला, असेही आव्हाड म्हणाले. आव्हाड आणि फडणवीस यांच्या वादात काँग्रेसचे नाव येणे योग्य वाटत नाही. तसेच फडणवीस यांनी काँग्रेसबाबत जो मुद्दा उचलला आहे, त्याला काहीच अर्थ उरत नाही. पण या वादाच्या निमित्ताने फडणवीस छत्रपती शिवरायांची शाब्दिक अवहेलना करत असून काँग्रेसवर त्याचे खापर फोडत आहेत, असे दिसते. फडणविसांकडून राज्याची व राज्याच्या आराध्यदैवताची बदनामी थांबवा, अशी अपेक्षा केली तर त्यात वावगे वाटण्याचा प्रश्न येत नाही.

**जाहिरातीसाठी एकमेव दै. 'महाराष्ट्र सम्राट'**

☆ मिळकट नोटीस ☆ हस्तांतर करार नोटीस
☆ नोंदणी न्यास नोटीस ☆ निविदा जाहिरातीसाठी
☆ तहसिल जाहीरनामा ☆ कामगार न्यायालय नोटीस
- दिलेल्या जाहिरात त्वरित प्रसिद्ध करणेसाठी एकमेव दैनिक महाराष्ट्र सम्राट
- शुभेच्छा / वाढदिवस जाहिरातीसाठी महाराष्ट्रातील प्रभावी दैनिकांपैकी एक म्हणजे महाराष्ट्र सम्राट

संपर्क : दै. महाराष्ट्र सम्राट, विक्रीकर कार्यालय शेजारी, गेट नं. ४, कलेक्टर कंपाऊंड, कोर्टनाका, ठाणे (प.) ४००६०१
☎ 022 - 25379944 , +91 - 9167957771

* पीआरबी कायद्यानुसार सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीनकक्षेच्या आधीन राहिल. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या / लेख / जाहिराती यांची जबाबदारी संबंधित वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यात राहिल.)

महाराष्ट्र सम्राट
*DISCLAIMER: Readers are requested to verify and make appropriate enquires to satisfy themselves about the veracity of an advertisement before responding to any published in this newspaper. The publisher & the owner of this newspaper, does not vouch for the authenticity of any advertiser's products and/ or services. In no event can the Owner, Publisher, Printer, Editor, Director's, Employees of this newspaper/ company be held responsible/liable in any manner whatsoever for any claims and/or damages for advertisments in the newspaper.

# हा अपमान महाराष्ट्राचा आहे आणि याला कधीच माफी नाही

**उद्धव ठाकरे म्हणाले की, ते म्हणतात आम्ही राजकारण करतोय, तर तुम्ही गजकर्ण करत आहात. या चुकीला माफी नाही. देशाच्या प्रवेश द्वारावर आम्ही सांगत आहोत. माफी नसती मागितली, तर शिल्लक ठेवलं नसतं महाराष्ट्राने असा घणाघात उद्धव ठाकरे यांनी केला. मग्रुरीने माफी मागितली, त्यात हाल्फ आणि फुल हसत होते, असा टोलाही त्यांनी लगावला. माफी का मागितली सांगा? अशी विचारणा त्यांनी केली. नौदल दिवशी घाईने काही करायची गरज नाही. माफी कशाकशाची मागणार? राम मंदिर, महाराजांचा पुतळा अनेक घटना घडल्या त्यासाठी का? अशीही विचारणा त्यांनी केली. हा अपमान महाराष्ट्राचा आहे आणि याला कधीच माफी नसल्याचे त्यांनी सांगितले.**

## शिवद्रोह्यांना गेट आऊट करा–ठाकरे



छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा सिंधुदुर्गच्या राजकोटवर कोसळला. या पार्श्वभूमिवर सरकारचा निषेध करण्यासाठी 'जोडे मारो'आंदोलनाचे महाविकास आघाडीने आयोजन केले होते. त्यासाठी हुतात्मा चौक ते गेट वे ऑफ इंडिया पर्यंत मोर्चाचेही आयोजन केले होते. हा मोर्चा गेट वे वर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापर्यंत काढण्यात आला. यावेळी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी महायुती सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. शिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही खडेबोल सुनावले. शिवाय 'गेट आऊट' ऑफ इंडिया अशी घोषणा देत सरकारला गेट आऊट करण्याचे आवाहन कार्यकर्त्यांना आणि शिवप्रेमींना या वेळी केलं. उद्धव ठाकरे यांनी आक्रमक भाषण करत महायुती सरकार बरोबरच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना यावेळी खडेबोल सुनावले. महायुतीने मोठी चुकी केली आहे. पंतप्रधान, मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांनी माफी मागितली आहे. पण चुकीला माफी नाही अशा शब्दात ठाकरेंनी खडसावले. हे सरकार शिवद्रोही आहे. त्याचा संताप व्यक्त करण्यासाठी आलो आहे. अशा या शिवद्रोही सरकारला गेट आऊट ऑफ इंडिया करण्याची वेळ आली आहे असे ते म्हणाले. छत्रपतींचा पुतळा कोसळला असं असताना सत्ताधारी राजकारण करत आहेत. त्यांचे हे राजकारण नसून गचकरण असल्याचा हल्लाबोल ठाकरे यांनी यावेळी केला.

## ठाकरेंनाच २ वर्षापूर्वी जनतेने गेट आऊट केले– ना. एकनाथ शिंदे

महाविकास आघाडीच्या जोडे मारो आंदोलनातून उद्धव ठाकरे यांनी महायुतीवर जोरदार निशाणा साधला. यालाच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पलटवार केला आहे. दोन वर्षांपूर्वीच जनतेनं त्यांना गेट आऊट केले आहे. जनतेने त्यांना सत्तेतून पायउतार करून घरात बसवलं आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचं नाव घेऊन राजकारण करून औरंगजेब आणि अफझल खानाच्या वृत्तीचं काम करणं असं सध्या त्यांच्यात सुरू आहे, असे म्हणत ना. शिंदे यांनी महाविकास आघाडी आणि नाव न घेता उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल केलाय. तर छत्रपती शिवाजी महाराज यांचं नाव घेऊन शिवसेना आणि भाजप यांच्या सरकारमध्ये, सत्तेत सामील झालेत पण सरकार स्थापन केलं दुसऱ्यांसोबत असं वागणाऱ्यांचे शिवाजी महाराज यांच्यावर कसं प्रेम असू शकतं? असा सवालही मुख्यमंत्री शिंदे यांनी करत अप्रत्यक्षपणे ठाकरेंना केला. आम्ही इतकंच सांगतोय छत्रपती शिवाजी महाराज यांचं नाव घेऊन कुणीही राजकारण करू नये, असं आवाहन देखील एकनाथ शिंदे यांनी विरोधकांना केले आहे.

## महाराष्ट्र, भारत नव्हे तर भारताबाहेर देखील लोक संतप्त, जे घडलं त्याला मोकळं सोडलं जाणार नाही; शाहू महाराज कडाडले

शाहू महाराज म्हणाले की, मालवणमध्ये जे काही झालं ते आपण सर्वांनी पाहिलं आहे. या घटनेनंतर महाराष्ट्र, भारत नव्हे तर भारताबाहेर देखील लोक संतप्त झाले आहेत. अशा पद्धतीने महाराजांचा पुतळा बसवणे हा महाराजांचा अपमान आहे. त्यामुळे जे घडलं आहे त्याला मोकळं सोडलं जाणार नाही. या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये संताप असल्याने दोषींवर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी शाहू महाराजांनी यावेळी केली. महाराजांचा मान चांगल्या पद्धतीनेच ठेवला पाहिजे. त्या पद्धतीनेच पावलं उचलली गेली पाहिजेत. ज्यानी पुतळ्याचा कार्यक्रम करून घेतला, त्यांचा निषेध केला पाहिजे असेही शाहू महाराज यावेळी म्हणाले.

## हिंदुत्व सोडले यावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब–चित्रा वाघ

ज्या वीर सावरकरांनी शिवरायांवर सुंदर अशी आरती लिहिली, त्यांचे नाव घेणे तुम्हाला मग्रुरी वाटते? तुमच्या मनातील सावरकर द्वेष आज पुढे आला आहे. आपण हिंदुत्व सोडले यावर पुन्हा एकदा आज शिक्कामोर्तब झाले. लक्षात ठेवा ज्यांनी हिंदुत्व सोडले त्यांना आमचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव घेण्याचा सुद्धा अधिकार नाही, असे पलटवार चित्रा वाघ यांनी केला आहे.

## शिवाजी महाराजांनी सूरत लुटली नव्हती, केवळ...; फडणवीसांनी सांगितला इतिहास, पवार–ठाकरेंना सवाल

देवेंद्र फडणवीस छत्रपती संभाजीनगरमध्ये एका कार्यक्रमानिमित्त आले असता माध्यमांशी बोलताना त्यांनी महाविकास आघाडीच्या आंदोलनावर भाष्य केलं. राजकीय हेतूने त्याचं आंदोलना प्रेरीत असल्याची टीका सत्ताधाऱ्यांकडून केली जात आहे. ''माझा उद्धव ठाकरेंना सवाल आहे की, नेहरूंनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल डिस्कवरी ऑफ इंडियामध्ये जे लिहिलेलं आहे, त्या संदर्भात काँग्रेसला माफी मागायला लावणार का?. काँग्रेसने मध्यप्रदेश मध्ये ज्या प्रकारे शिवाजी महाराजांचा पुतळा बुलडोजर लावून तोडला, त्यावरती शरद पवार साहेब आणि उद्धव ठाकरे साहेब मुग गिळून का बसले आहेत?. कर्नाटकमध्ये काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांनी शिवरायांचा पुतळा का हटवला, याबद्दल ते का बोलत नाहीत?'', या प्रश्नांची उत्तरं पहिल्यांदा त्यांनी दिली पाहिजे.

आम्हाला काँग्रेसने इतिहासात शिकवलं की, शिवाजी महाराजांनी सूरत लुटली. पण, महाराजांनी सूरत लुटली नव्हती, महाराजांनी केवळ स्वराज्याचा खजिना योग्य त्या लोकांकडून घेतला होता, किंवा त्यांच्यावर आक्रमण केलं होतं. पण, सूरत कधी लुटली नव्हती, जणू काही सर्वसामान्य लोकांची लूट करायला महाराज गेले अशा प्रकारचा इतिहास काँग्रेसने आम्हाला इतकी वर्ष शिकवला, त्याला माफी मागायला सांगणार आहात का?, असा सवाल देवेंद्र फडणवीसांनी विचारला आहे. तसेच, केवळ खुर्ची करता त्यांचे मिंधेपण स्वीकारणार आहात का? हे तुम्ही सांगितलं पाहिजे, असा टोलाही फडणवीसांनी शरद पवार आणि

## फडणवीस महाराष्ट्राचे खलनायक–राऊत

महाराष्ट्र तोडण्यासाठी आणि विदर्भ वेगळा करण्यासाठी ज्यांनी लग्न न करण्याचा निर्धार केला होता ते देवेंद्र फडणवीस आम्हाला शिकवित आहेत. त्यांनी कधीही महाराष्ट्राच्या अस्मितेचा विचार केलेला नाही त्यांनी सतत महाराष्ट्राचा अपमान करणाऱ्यांना पाठीशी घातले ते देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे खरे व्हीलन आहेत. त्यांचे मंत्री केसरकर महाराजांचा पुतळा पडला तर या मागे काही चांगले घडणार असे संकेत असतील असे बेताल बोलतात आणि त्यांना फडणवीस पाठीशी घालतात. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी देखील शिव छत्रपतींविषयी खुलेआम अपशब्द काढले त्यावेळी देखील देवेंद्र फडणवीस गप्प राहीले, त्यांना महाराष्ट्राच्या अस्मितेचे काही पडलेले नाही असा टोलाही शिवसेना नेते आणि खासदार संजय राऊत यांनी लगावला आहे.

## मुख्यमंत्री शिंदेंची पहिली प्रतिक्रिया

**(पान १ वरून) महाविकास आघाडीवर निशाणा–** महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये लेकीबाळी सुरक्षित होत्या का. नवनीत राणांना जेलमध्ये टाकलं. कंगना राणावतचं घर तोडलं. किती महिलांवर अन्याय केला महाविकास आघाडी सरकारमध्ये. यांना शिवाजी महाराजांचं नाव घेण्याचा किती अधिकार पोहोचतो माहीत नाही. पण महाराजांच्या नावाने राजकारण करू नये, असा गंभीर आरोप मुख्यमंत्री शिंदे यांनी महाविकास आघाडीवर केला आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुपरहीट झाली आहे. गावागावात शहराशहरात खेड्यापाड्यावर मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना पोहोचली आहे. दुर्देव बघा. काँग्रेसचा माणूस अनिल वडपल्लीवार कोर्टात आडवा झालाय. तो कुणाचा कार्यकर्ता आहे. कुणाचा पोलिंग एजंट आहे. काँग्रेस आणि आघाडीने हायकोर्टातही याचिका केली. ती फेटाळली. आता नागपूरला याचिका केली आहे. पण ही यशस्वी योजना आहे. विरोधक काहीही बोलले तरी लोकांना ही योजना पटली आहे, असं शिंदेंनी म्हटलं.

## ठाणे खरेच खूप बदलते आहे, ठाण्याचा विकास झपाट्याने होत आहे

**(पान १ वरून)** त्या किनारी भागात अर्बन फॉरेस्ट हे सगळीकडे उपलब्ध होत नाही. ते ठाण्यात उपलब्ध आहे. ठाणेकरांना तणावमुक्त जीवन जगण्यासाठी, मनोरंजनासाठी ही मोठी सुविधा विकसित झाली आहे. त्याचे उद्घाटन आज संपन्न झाले.

त्याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आरमाराची प्रतिकृती तयार करण्याच्या प्रकल्पाचे भूमीपूजनही आज करण्यात आले. १२ समाजाचे मिळून समाज भवनाचेही भूमीपूजन केले. ठाणे खरेच खूप बदलते आहे. ठाण्याचा विकास झपाट्याने होत आहे, असेही मुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले.

मुंबई–ठाण्यात जागा मिळणे कठीण आहे. पण आम्ही वचन दिल्याप्रमाणे सर्व समाजांसाठी हे भवन उभे राहणार आहे. प्रत्येक समाजाला तीन हजार फूटांची जागा मिळणार आहे. प्रत्येक मजल्यावर दोन समाजांसाठी जागा असेल. त्याचे भाडे नाममात्र एक रुपया ठेवण्याचे निर्देश मी महापालिका आयुक्तांना दिले आहेत. या तयार होणाऱ्या इमारतीची देखभाल करणे, ती उत्तम ठेवणे आणि सुविधा सर्व समाजाला उपलब्ध करून देणे, ही सर्व समाजांची जबाबदारी आहे, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले. धर्मवीर आनंद दिघे यांचा सर्व समाजांशी संपर्क असायचा. तीच शिकवण त्यांनी आम्हाला दिली आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे ठाण्यावर अतिशय प्रेम होते. त्यामुळे ठाण्यात असे प्रकल्प होत आहेत. मुख्यमंत्र्यांचे ठाणे बदलत आहे, असेही प्रतिपादन मुख्यमंत्री शिंदे यांनी केले. त्याचबरोबर मुख्यमंत्र्यांचे हरित ठाणे या अभियानात एक लाख झाडे लावण्याचे उद्दिष्ट पूर्ण केल्याबद्दल महापालिका आयुक्त सौरभ राव यांचे मुख्यमंत्र्यांनी अभिनंदन केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अंतर्गत मेट्रोला मान्यता दिली आहे. त्याचाही ठाण्याला मोठा फायदा होणार आहे.वाहतुकीच्या प्रश्नावर तोडगा काढण्याचे काम सुरू केले आहे. घोडबंदर रस्ता मोठा होणार आहे. गायमुख ते फाऊंटन भुयारी मार्ग, ठाणे–बोरिवली भुयारी मार्ग, आनंदनगर – गायमुख बायपास यांचीही कामे होणार आहेत. याचा फायदा ठाणेकरांना होईल, असेही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले. ठाणे बदलत असल्याचे आपल्याला सगळीकडे दिसत आहे. या विकासाने ठाण्यात सोनेरी कळस गाठला आहे, असे प्रतिपादन यावेळी खासदार नरेश म्हस्के यांनी केले. तर,सर्व प्रकल्पांसाठी निधी देणारे हे दिलदार मुख्यमंत्री आहेत. त्यांच्या सहकार्याने सगळे प्रकल्प मार्गी लागत आहेत. तब्बल १२ समाजांना सामावून घेणारे समाज भवन ही अनोखी गोष्ट आहे. ही वचनपूर्ती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामुळे शक्य झाल्याचे प्रतिपादन आमदार प्रताप सरनाईक यांनी केले.

समाज भवनाच्या भूमीपूजनापूर्वी मुख्यमंत्री शिंदे यांनी गायमुख येथील हिंदुहृदयसम्राट हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे चौपाटी, गायमुख – टप्पा २ चे लोकार्पण केले. तर, नागला बंदर येथील खाडी किनारा विकसित करून आरमार केंद्राची प्रतिकृती उभारण्यात येणार आहे, त्या प्रकल्पाचे भूमीपूजन संपन्न झाले.

त्यापूर्वी डॉ.सिंधूताई सपकाळ तिरंदाजी केंद्राचे प्रत्यक्ष तिरंदाजी करून मुख्यमंत्री शिंदे यांनी लोकार्पण केले. त्यानंतर, स्व. बाबूराव सरनाईक जिम्नॅस्टिक सेंटर येथे झालेल्या सोहळ्यात, वर्तकनगर प्रभाग समिती क्षेत्रात समता नगर, राजीव गांधी नगर आणि सिद्धिविनायक नगर या तिन्ही सुविधा भूखंडांवरील अस्तित्वात असलेल्या पुनर्वसित वसाहतींचा खाजगी लोकसहभागातून पुनर्विकास प्रकल्प, वसंत विहार येथे चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण केंद्र व वसतिगृह आणि शिवाईनगर येथील राखीव भूखंडावर स्व. सुधाकर वामन चव्हाण बहुउद्देशीय इमारत प्रकल्प यांचे ऑनलाईन भूमीपूजन संपन्न झाले.

या सोहळ्यात जिम्नॅस्टिकची प्रात्यक्षिकेही सादर करण्यात आली. त्याचे संयोजन जिम्नॅस्टिकमधील आंतराष्ट्रीय स्तरावरील पूजा आणि मानसी सुर्वे या खेळाडूंनी केले. या दोन्ही केंद्रांतील खेळाडू आतंरराष्ट्रीय स्तरापर्यंत जातील, असा विश्वास मुख्यमंत्री शिंदे यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केला.

## जनकल्याण स्मार्ट कार्ड चे आ. संजय केळकर यांच्या पुढाकाराने हजारो महिलांना वाटप...

**(पान १ वरून)** देण्यात आले. स्वयं रोजगारासाठी दरवर्षी दिवाळी सणात महिला बचतगटाच्या २००–२५० महिलांना स्टॉलच्या माध्यमातून मोठे उत्पन्न मिळत असते. बचतगटाच्या २५ महिला चपाती–भाकरीची ऑनलाईन विक्री करतात. उत्तम पॅकिंग आणि गुणवत्ता असलेले हे अन्न पदार्थ घरपोच दिले जातात. यातून महिलांचे सक्षमीकरण होत आहे. सिव्हिल रुग्णालयात बाळंत महिलांना बाळंत विडा म्हणून आवश्यक साहित्याचे किट देण्यात येत आहे. हे उपक्रम वर्षभर राबवले जातात. अशी माहिती त्यांनी दिली.

महिला विकास परिवाराचे संयोजक पंढरीनाथ पवार, ठाणे जिल्हा हौसिंग फेडरेशनचे अध्यक्ष सीताराम राणे, माजी उपमहापौर सुभाष काळे, परिवहन सदस्य विकास पाटील, व्यापारी आघाडीचे ठाणे शहर अध्यक्ष मितेश शाह, मृणाल पेंडसे, माजी नगरसेविका प्रतिभा मढवी, नम्रता कोळी व हजारो महिला उपस्थित होत्या.





शिवसेना ठाणे जिल्हा शाखेच्या वतीने महिला विभागाचा महिलांनी मंगला गौर चे आयोजन केले होते यावेळी महिलांनी नाचत गाजत मंगला गौरी चे खेळ खेळून आनंद घेतले यावेळी मुख्यमंत्री यांच्या पत्नी लता एकनाथ शिंदे , महिला आघाडी प्रमुख मीनाक्षी शिंदे , यांचा सह महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्तित होते. (छाया – मनोज सिंह)

**नवी मुंबई महानगरपालिका**

**विद्युत विभाग**

**निविदा सुचना क्र.का.अ(वि)परी-2/16/2024-2025**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (रू.) |
|---|---|---|
| 1 | नमुंमपा शाळा क्रं-46 विठ्ठल मंदिर गोठिवली गाव येथील शाळेच्या अंतर्गत विद्युतीकरणाची दुरुस्ती करणे. | 6,46,053/- |
| 2 | घणसोली विभागातील कांशीराम हिंदी विद्यालय शाळा क्रं-78 मधील जुने पंखे बदलुन नवीन Energy Saving पंखे लावणेबाबत. | 4,98,645/- |

**निविदा पुस्तीका ई-निविदा (E-tendaring) सगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर व नमुंमपाच्या www.nmmc.gov.in संकेत स्थळावर दिनांक- 02/09/2024 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर Online करण्याचे आहे. ई-निविदा (E-tendering) प्रक्रियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणींसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबर वर संकर्क करावे.**

**कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.**

सही/-
**श्री. प्रविण हिंदुराव गाडे**
**कार्यकारी अभियंता (वि-2)**
**जा.क्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/307/2024** **नवी मुंबई महानगरपालिका**

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**निविदा सूचना**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात "मागासवर्गीय निधी" या लेखाशीर्षका अंतर्गत दिवा प्रभाग समिती प्र.क्र. २८ मध्ये कॉंक्रिटीकरण करणेच्या ३ कामांकरिता ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकीय/ निमशासकीय/ सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्तभंगाचे कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरु आहे, अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सुचना व निविदा प्रपत्र संकेतस्थळ https:://mahatenders.gov.in वर दि.०२/०९/२०२४ ते दि.०९/०९/२०२४ रोजी पर्यंत सायं. १६:०० वाजेपर्यंत उपलब्ध आहेत. ऑनलाईन निविदा संकेतस्थळ वर दि.०९/०९/२०२४ रोजी सायं. १६:०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. निविदा दि.०९/०९/२०२४रोजी सायं. १६:३० वाजता निविदाकार अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/सा.बा/३९५/२०२४-२५ **सही/-**
दि.३०.०८.२०२४ कार्यकारी अभियंता
**Pls visit our oficial web-site** ठाणे महानगरपालिका, ठाणे
**www.thanecity.gov.in**

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक बांधकाम विभाग,
**निविदा सूचना**

ठाणे महानगरपालिका हद्दीतील "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास या लेखाशिर्षका अंतर्गत "ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील नौपाडा कोपरी प्रभाग समिती अंतर्गत विविध रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणे, मलवाहिनी टाकणे, वाहतुक नियमन व मैदानामध्ये विविध स्थापत्य कामे करणे." या कामासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहे. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकीय / निमशासकीय / सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्तभंगाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरु आहे, अशा कंत्राटदारांना सदरच्या निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. कामाची सविस्तर निविदा सुचना व प्रपत्र www.mahatenders.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर दि. ०२/०९/२०२४ ते दि. ०९/०९/२०२४ सायं. १६.०० वाजेपर्यंत उपलब्धअसतील. सदर निविदा ई टेंडरींग पध्दतीने दि.०९/०९/२०२४ रोजी १६.०० पर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा शक्य झाल्यास दि.११/०९/२०२४ रोजी १६.०० वाजता उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील. अधिक माहितीसाठी दुरध्वनी क्र. ०२२-२५३४७७१४ या क्रमांकावर संपर्क साधावा.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-मु/३९४/२०२४-२५ सही/-
दि:३०.०८.२०२४ नगर अभियंता
**Pls visit our oficial web-site** ठाणे महानगरपालिका, ठाणे
**www.thanecity.gov.in**

## भारतीय रेल्वे

### महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

■ पदाचे नाव :
१ राज्य संसाधन व्यक्ती (SRPs)
■ शैक्षणिक पात्रता: (i) पदवीधर/MSW/MBA (ii) मराठी आणि MSऑफिसचे ज्ञान आवश्यक. (iii) ०७ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ६० वर्षांपर्यंत.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : फी नाही.
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://www.umed.in/




■ पदाचे नाव :
१ डायटीशियन
२ नर्सिंग सुपरिटेंडेंट
३ ऑडिओलॉजिस्ट स्पीच थेरेपिस्ट
४ क्लिनिकल सायकोलॉजिस्ट
५ डेंटल हाइजीनिस्ट
६ डायलिसिस टेक्निशियन
७ हेल्थ मलेरिया इंस्पेक्टर ग्रेड III
८ लॅब सुपरिंटेंडेंट ग्रेड III
९ पर्फ्युजनिस्ट
१० फिजियोथेरेपिस्ट ग्रेड II
११ ऑक्यूपेशनल थेरेपिस्ट
१२ कॅथ लॅब टेक्निशियन
१३ फार्मासिस्ट
१४ रेडिओग्राफर एक्स-रे टेक्निशियन
१५ स्पीच थेरपिस्ट
१६ कार्डियाक टेक्निशियन
१७ ऑप्टोमेट्रिस्ट
१८ ECG टेक्निशियन
१९ लॅब असिस्टंट ग्रेड II
२० फील्ड वर्कर
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: B.Sc + डायटीशियन PG डिप्लोमा किंवा B.Sc (Home Science) + M.Sc Home Science (Food and Nutrition)
पद क्र.२: GNM² किंवा B.Sc (Nursing)
पद क्र.३: B-SLP
पद क्र.४: पदव्युत्तर पदवी (Clinical Psychology / Social Psychology)
पद क्र.५: (i) B.Sc (Biology) (ii) डेंटल हाइजीन डिप्लोमा (iii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.६: B.Sc.+डिप्लोमा (Haemodialysis) किंवा ०२ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) B.Sc.(Chemistry) (ii) हेल्थ / सॅनिटरी इंस्पेक्टर डिप्लोमा किंवा NTC (Health Sanitary Inspector)
पद क्र.८: B.Sc (Bio-Chemistry / Micro Biology / Life science)+DMLT किंवा B.Sc (Medical Technology)
पद क्र.९: B.Sc + डिप्लोमा (Perfusion Technology) किंवा B.Sc + ०३ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) फिजिओथेरेपी पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.११: (i) १२वी उत्तीर्ण (ii) ऑक्यूपेशनल थेरेपी डिप्लोमा/पदवी
पद क्र.१२: B.Sc+ डिप्लोमा (Cardiac Professional Cath Lab work) किंवा ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१३: १२वी उत्तीर्ण+D.Pharm किंवा B.Pharma
पद क्र.१४: १२वी उत्तीर्ण (PhysicsChemistry) (ii) डिप्लोमा (Radiography/ X Ray Technician/ Radiodiagnosis Technology)
पद क्र.१५: (i) B.Sc (ii) डिप्लोमा (Audio and Speech Therapy) (iii) २ वर्षे अनुभव
पद क्र.१६: १२वी (Science) उत्तीर्ण किंवा डिप्लोमा (Cardiology Lab)
पद क्र.१७: B.Sc (Optometry) किंवा (Ophthalmic Technician)
पद क्र.१८: (i) १२वी उत्तीर्ण /B.Sc (ii) डिप्लोमा/पदवी (ECG Laboratory Technology / Cardiology /Cardiology Technician / Cardiology Techniques )
पद क्र.१९: (i) १२वी उत्तीर्ण (ii) DMLT
पद क्र.२०: १२वी उत्तीर्ण (Biology/ Chemistry)
■ वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१,४,५,७,८,१०, ११, १२, १५ ते १९: १८ ते ३६ वर्षे
पद क्र.२: २० ते ४३ वर्षे
पद क्र.३: २१ ते ३३ वर्षे
पद क्र.६: २० ते ३६ वर्षे
पद क्र.९: २१ ते ४३ वर्षे
पद क्र.१३: २० ते ३८ वर्षे
पद क्र.१४: १९ ते ३६ वर्षे
पद क्र.२०: १८ ते ३३ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: ५००/- SC/ST/ExSM²/ /EBC/महिला: २५०/-
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १६ सप्टेंबर २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत संकेतस्थळ https://indianrailways.gov.in/

### भारतीय सर्वोच्च न्यायालय

■ जागा : ८० जागा
■ पदाचे नाव:
१ ज्युनियर कोर्ट अटेंडंट (स्वयंपाकाचे
■ शैक्षणिक पात्रता: (i) १०वी उत्तीर्ण (ii) पाककला डिप्लोमा (iii) ०३ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते २७ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: दिल्ली
■ Fee: General/OBC: ४००/- SC/ST/PWD/ExSM²: २००/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १२ सप्टेंबर २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://www.sci.gov.in/

### केंद्रीय लोकसेवा आयोग

■ पदाचे नाव :
१ डेप्युटी सुपरिंटेंडिंग आर्कियोलॉजिस्ट ६७
२ केबिन सेफ्टी इंस्पेक्टर १५
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) पदव्युत्तर पदवी (Archaeology/Indian History/-nthropology) (ii) PG डिप्लोमा/ एडवांस डिप्लोमा (Archaeology) किंवा ०३ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) १२वी उत्तीर्ण (ii) केबिन क्रू म्हणून दहा वर्षांचा अनुभव आणि सध्या केबिन क्रू म्हणून कार्यरत.
■ वयाची अट: ०५ सप्टेंबर २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: ३५ वर्षांपर्यंत
पद क्र.२: ४० वर्षांपर्यंत
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: २५/- SC/ST/PH/महिला: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०५ सप्टेंबर २०२४ (११:५९ PM²)
■ अधिकृत वेबसाईट https://upsc.gov.in/

### उत्तर रेल्वे

■ पदाचे नाव :
१ अप्रेंटिस (प्रशिक्षणार्थी) ४०९६
■ शैक्षणिक पात्रता: (i) ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण (ii) संबंधित ट्रेड मध्ये ITI
■ वयाची अट: १६ सप्टेंबर २०२४ रोजी १५ ते २४ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: उत्तर रेल्वे
■ Fee: General/OBC: १००/- SC/ST/PWD/महिला: फी नाही
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १६ सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://nr.indianrailways.gov.in/

### महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

■ पदाचे नाव :
१ राज्य संसाधन व्यक्ती (SRPs)
■ शैक्षणिक पात्रता: (i) पदवीधर/MSW/MBA (ii) मराठी आणि MSऑफिसचे ज्ञान आवश्यक. (iii) ०७ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी ६० वर्षांपर्यंत.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : फी नाही.
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://www.umed.in/

सिंचन प्रकल्पासाठी भूसंपादन २०२३ मध्ये; कोरोनामुळे मोबदला मात्र सन २०१९ च्या बाजारमूल्यानुसार

# धरणांसाठी जमिनी देणाऱ्या शेतकऱ्यांचे कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आर्थिक नुकसान

## प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांकडून २०२३ साठी एका वर्षाची अट शिथिल करण्याची मागणी

ठाणे : राज्यातील विविध जलसिंचन प्रकल्पांसाठी ज्या शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी दिल्या आहेत त्या शेतकऱ्यांना मोबदला देताना कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सन २०१९ चे जमीन खरेदी - विक्रीचे नोंदणीकृत व्यवहार गृहीत धरले जाणार असल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होणार असल्याचे उघडकीस आले आहे. २४ जानेवारी २०२३ मध्ये प्रसिद्ध केलेल्या शासन परिपत्रक क्र . संकीर्ण - २०२३ / प्र. क्र. ०२ / अ - २ मुळे मोबदल्याची रक्कम ठरवताना आधीचे एक वर्ष वगळण्यात येत असते. या नियमाचा फटका शेतकऱ्यांना सहन करावा लागणार आहे. कोरोना काळात जमीन खरेदी - विक्रीचे व्यवहार झालेले नाहीत ; त्यामुळे सन २०१९ मधील व्यवहार गृहीत धरले जाणार असल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार आहे. त्यामुळे सन २०२३ मध्ये ११ (१) ची अधिसूचना प्रसिद्ध केलेल्या प्रकल्पांसाठी एक वर्षाची अट शिथिल करण्यात यावी, अशी मागणी आता शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

जमीन सिंचनाखाली आणण्यासाठी राज्य शासनाकडून विविध सिंचन प्रकल्प राबविण्यात येत असतात. या प्रकल्पांसाठी ज्या शेतकऱ्यांची जमीन संपादित करण्यात आली आहे ; त्या शेतकऱ्यांना मोबदला देण्याची प्रक्रिया संबधित जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत राबविण्यात येत असते. हा मोबदला देण्यासाठी जी प्रक्रिया राबविण्यात येत असते; त्यामध्ये ११(१) ची अधिसूचना अतिशय महत्वाची आहे. या अधिसूचनेच्या अनुषंगाने जानेवारी २०२३ मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या शासन परिपत्रक क्र. संकीर्ण -२०२३ /प्र. क्र. ०२/ अ -२ मधील नियमावलींवर बोट ठेवून दरनिश्चिती करीत शेतकऱ्यांना मोबदला देण्यात येणार आहे. या शासन परिपत्रकानुसार मोबदला देताना भूसंपादनाची ११ (१) ची अधिसूचना निर्गमित झालेल्या दिनांकाच्या एका वर्षातील खरेदी- विक्री व्यवहार वगळण्यात येणार आहेत. त्यामुळे सन २०२३ या वर्षांत ज्या प्रकल्पांसाठी ११ (१) ची अधिसूचना प्रसिद्ध झाली आहे, त्या प्रकल्पांसाठी त्या क्षेत्रातील २०१९ , २०२० व २०२१ चे जमीन खरेदी - विक्रीचे नोंदणीकृत व्यवहार ग्राह्य धरण्यात येणार आहेत. परंतु, सन २०२२ पर्यंत करोना महामारी असल्याने या काळात जमीन खरेदी- विक्रीचे व्यवहार झालेले नाहीत. परिणामी, कोरोना काळातील जमीन दर ग्राह्य धरता येणे शक्य नाही. ही अडचण निर्माण झाल्याने आता प्रकल्पांमध्ये ज्यांच्या जमिनी गेल्या आहेत;. त्यांना मोबदला देताना २०१९ मध्ये नोंद झालेल्या खरेदी - विक्री व्यवहारांचा विचार केला जाणार आहे. तेव्हाचे दर आणि आताचे दर यांच्यात प्रचंड तफावत असून सन २०१९ मध्ये अत्यंत कमी दर असल्याने सरकारी प्रकल्पांसाठी जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे.

सैनिकांचे गाव अशी ओळख असलेल्या रत्नागिरी जिल्ह्याच्या खेड तालुक्यातील शिवतर गावातील आजी- माजी सैनिकांनी तसेच शेतकऱ्यांनी आपल्या वडिलोपार्जित जमिनी महाराष्ट्र शासनाच्या जलसंधारण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या जलसिंचन प्रकल्पासाठी उपलब्ध करून दिल्या आहेत. यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत भूसपांदन करण्याची प्रक्रिया कोविडनंतर राबविण्यास सुरुवात झाली असून या प्रकल्पातील भूसंपादनासाठी २० एप्रिल २०२३ रोजी ११ (१) ची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झाली आहे. शासन परिपत्रक क्र . संकीर्ण - २०२३/ प्र. क्र . ०२ / अ -२ , दिनांक २४ जानेवारी २०२३ नुसार अधिसूचना प्रकाशित केलेली तारीख २० एप्रिल २०२३ ही असल्याने दिनांक १९ एप्रिल २०२३ ते दिनांक १९ एप्रिल २०२२ या कालावधीमध्ये झालेले खरेदी - विक्रीचे नोंदणीकृत व्यवहार वगळावे लागणार आहेत.

शासकीय परिपत्रकानुसार भूसंपादन दर निश्चितीसाठी २०१९ , २०२० व २०२१ मधील जमीन खरेदी - विक्रीचे दर ग्राह्य धरले जाणार आहेत. परंतु, सन २०२० पासून सन २०२२ पर्यंत करोनाकाळ असल्यामुळे त्या काळात व्यवहार झालेले नाहीत. परिणामी, सन २०१९ मधील खरेदी- विक्रीचे दर ग्राह्य धरले जाणार आहेत. त्यावेळी या भागात जमिनीचा दर हा प्रति गुंठा २ हजार ६४९ रुपये इतका होता. तर, हाच दर आता प्रतिगुंठा ९ हजार रुपयांपेक्षा अधिक आहे. असे असताना जलसिंचन प्रकल्पांसाठी आपल्या वडिलोपार्जित जमिनी दिलेल्या आजी- माजी सैनिकांना मोठे नुकसान सहन करावे लागणार आहे. यासंदर्भात सरपंच सुभाष पांडुरंग मोरे, उपसरपंच मंगेश जगन्नाथ मोरे व शिवतर ग्रामस्थ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रोहिदास पांडुरंग मोरे यांनी मुख्यमंत्र्यांकडे दाद मागितली असून सन २०२३ साठी ही अट शिथील करण्याची विनंती केली आहे.



ठाण्यातील डॉ. लकी कासट आणि डॉ. सुप्रिया लाड चिंचोलकर यांच्या हस्ते

# टोरंट पॉवर कर्मचाऱ्यांसाठी आपत्कालीन वैद्यकीय सहाय्य प्रशिक्षण



ठाणे : सर्वसमावेशक प्रशिक्षण कार्यक्रमांद्वारे कर्मचाऱ्यांना सक्षम करण्याचे आपले मिशन सुरू ठेवत टोरंट पॉवरने नुकतेच आपत्कालीन वैद्यकीय सहाय्य प्रशिक्षण सत्र आयोजित केले. या प्रशिक्षणात कार्डिओ-पल्मोनरी रिससिटेशन (सीपीआर) आणि कॉम्प्रेशन-ओनली लाइफ सपोर्ट (सीओएलएस) तंत्रावर भर देण्यात आला.

रोटरी क्लब ऑफ ठाणे प्रीमियमचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ज्युपिटर हॉस्पिटलच्या डॉ. लकी कासट आणि रोटरी क्लब ऑफ ठाणे लेक सिटीच्या सदस्या डॉ. सुप्रिया लाड चिंचोलकर या ठाण्यातील दोन मान्यवर डॉक्टरांनी या सत्राचे आयोजन केले होते. प्रशिक्षणादरम्यान २५० हून अधिक कर्मचाऱ्यांना विविध वैद्यकीय परिस्थितीविषयी माहिती देण्यात आली, जिथे सीओएलएस आणि सीपीआर जीवनरक्षक ठरू शकतात. वैद्यकीय मदत येईपर्यंत महत्त्वपूर्ण प्राथमिक मदत प्रदान करण्यासाठी डॉक्टरांनी या तंत्रांचे महत्त्व अधोरेखित केले. डॉक्टरांनी आणलेल्या पुतळ्यांचा वापर करून सहभागींना प्रत्यक्ष प्रशिक्षणही देण्यात आले. डॉ. लकी आणि डॉ. सुप्रिया या दोघांनीही टोरंट पॉवरच्या उपक्रमाचे कौतुक केले आणि आणीबाणीच्या काळात जीव वाचविण्यासाठी अशा प्रकारचे प्रशिक्षण सत्र, व्यक्तींना ज्ञान आणि कौशल्याने सुसज्ज करणे कामी महत्वाचे असल्याचे अधोरेखित केले. टोरंट पॉवरचे जनसंपर्क अधिकारी चेतन बदियानी यांनी सांगितले की कंपनी आपल्या कर्मचार्यांच्या कल्याण आणि सुरक्षिततेसाठी कटिबद्ध आहे, त्यांची क्षमता आणि तयारी वाढविणार्या मौल्यवान प्रशिक्षण प्रदान करण्यासाठी सतत प्रयत्नशील असते.

जिल्ह्यात 'स्वच्छ माझे अंगण' अभियान

# प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आवाहन

ठाणे : राज्याच्या ग्रामविकास विभाग व पाणी व स्वच्छता विभागाच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छतेच्या बाबींची सवय अंगीकृत करण्यासाठी आता कुटुंबस्तरावर 'स्वच्छ माझे अंगण' हे अभियान जिल्ह्यात राबवण्यात येणार आहे. १ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर या कालावधीत हे अभियान राबविण्यात येणार असून, यात उत्कृष्ट स्वच्छता असणाऱ्या कुटुंबांचा ग्रामपंचायतीकडून गौरव करण्यात येणार आहे. या अभियानाची जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे.स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा २ अंतर्गत वैयक्तिक शौचालय, घनकचरा व्यवस्थापन, (कुटुंबस्तर), सांडपाणी व्यवस्थापन (कुटुंबस्तर) राबवीत असलेल्या राज्यातील सर्व कुटुंबस्तरावर या बाबींची प्रभावीपणे अंमलबजावणी होऊन नित्यनियमाने स्वच्छतेच्या बाबींची सवय अंगीकृत करण्यासाठी जे कुटुंब वैयक्तिक शौचालय, सांडपाणी व्यवस्थापनकरिता शोषखड्डा/परसबाग/ पाझरखड्डा, घनकचरा व्यवस्थापनाकरिता कंपोस्ट खतखड्डा अथवा घरगुती खतखड्डा आणि कुटुंबस्तरावर कचराकुंड्या याबाबतची उपलब्धता करून घेतली असून, त्यांचा नियमितपणे वापर करतात अशा कुटुंबांना प्रोत्साहन देणे आणि त्यांचे अनुकरण करण्याकरिता ग्रामस्थांना, कुटुंबधारकांना त्यांच्या प्रमाणेच वैयक्तिक स्वरुपांच्या स्वच्छतेच्या सुविधा आपल्या घरात किंवा परिसरात उपलब्ध करून घेण्यासाठी उद्युक्त करणे ही या अभियानाची संकल्पना आहे.

# रुबिना फ्रान्सिसने पॅरालिम्पिक गाजवलं, कांस्य पदकाला गवसणी

पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धेत भारताच्या रुबिना फ्रान्सिसने चमकदार कामगिरी करत महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूल SH1 फायनलमध्ये कांस्यपदक पटकावले. पॅरालिम्पिकमधील नेमबाजीतील भारताचे हे चौथे पदक ठरले आहे.

रुबिनाने १० मीटर एअर पिस्तूल SH1 पात्रता फेरीत सातवे स्थान पटकावले होते, मात्र अंतिम फेरीत दमदार कामगिरी केली. रुबिनाने पात्रता फेरीत ५५६ गुणांसह सातवे स्थान मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम फेरीत २११.१ गुणांनी . रुबिना एके काळी दुसऱ्या स्थानावर धावत होती, पण सहाव्या मालिकेत ती मागे पडली; पण अखेर पहिल्या तीनमध्ये राहण्यात यशस्वी झाली. पॅरिस पॅरालिम्पिकमधील नेमबाजीतील भारताचे हे चौथे पदक आहे. रुबिनापूर्वी अवनी लेखरा हिने महिलांच्या १० मीटर एअर रायफल स्टँडिंग SH1 स्पर्धेत भारतासाठी सुवर्णपदक , तर मोनाने कांस्यपदकावर आपली मोहर उमटवली होती. मनीष नरवालने पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तूल एसएच१ प्रकारात रौप्य पदक पटकावले आहे.

रुबिना फ्रान्सिस मूळची मध्य प्रदेशातील जबलपूर येथील आहे. निम्न-मध्यमवर्गीय कुटुंबात जन्मलेल्या रुबिनाला अनेक अडथळ्याचा सामना करावा लागला. रुबिनाचे वडील मेकॅनिक आहेत. आर्थिक अडचणींचा तिला सामना करावा लागला. २०१५ मध्ये गगन नारंगच्या ऑलिम्पिक कामगिरीची प्रेरित घेत रुबिनाचा नेमबाजीतील प्रवास सुरू झाला. आर्थिक अडथळे असूनही, तिच्या जिद्दीने वडिलांच्या अथक प्रयत्नांनी २०१७ मध्ये पुण्याच्या गन फॉर ग्लोरी अकादमीमध्ये ती दाखल झाली. येथे जय प्रकाश नौटियाल यांच्या मार्गदर्शनाखाली तिने सराव सुरु केला. तिची मध्य प्रदेश शुटींग अकादमीमध्ये निवड झाली. येथे तिला प्रख्यात प्रशिक्षक जसपाल राणा यांच्या मार्गदर्शन लाभले. तिने पहिले आंतरराष्ट्रीय पदक मिळवले.

२०१८ च्या फ्रान्स नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत तिने चमकदार कामगिरी केली. २०१९ मध्ये मुख्य प्रशिक्षक श्री. सुभाष राणा यांच्या मार्गदर्शनाखाली तिने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक पदके जिंकली आहेत. त्याचबरोबर जागतिक विक्रमही प्रस्थापित केले. लिमा २०२१ विश्वचषक स्पर्धेत तिची मुगुट कामगिरी झाली, जिथे तिने P2 प्रकारात पॅरालिम्पिक कोटा मिळवला, २०२१ टोकियो पॅरालिम्पिकमध्ये तिने भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. आज ती देशातील भारतातील तरुण मुलींसाठी एक प्रेरणा बनली आहे, आपल्या स्वप्नांचा पाठपुरावा करताना तिला अनेक अडथळ्यांना तोंड द्यावे लागते. मात्र दृढनिश्चय, परिश्रमातील सातत्य आणि समर्पणाच्या जोरावर आज तिने आंतरराष्ट्रीय पातळीवर देशासाठी अभिमानास्पद कामगिरी केली आहे. सामर्थ्याचा पुरावा आहे.



ठाणे महानगरपालिका मुख्यालयाच्या प्रांगणात, शनिवार, ३१ ऑगस्ट हा 'स्थानिक स्वराज्य दिन' साजरा करण्यात आला. या निमित्ताने, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांच्या हस्ते महापालिका ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) उमेश बिरारी, मुख्य अग्निशमन अधिकारी गिरीश झळके, माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर आदी अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# सप्टेंबरपासून ठाणे जिल्ह्यात २१व्या पशुगणनेला सुरुवात

ठाणे : ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागात कुत्र्यांसह बकरे, गाई, बैल, शेळ्या-मेंढ्या आहेत. याची गणना सप्टेंबरमध्ये होणार आहे. घरोघरी आणि पशुपालन संस्थांमध्ये ही पशुगणना होणार आहे. त्यासाठी महापालिका सहाय्य करणार असून प्रथमच मोबाइलमार्फत ही गणना प्रगणक करणार आहेत. चार हजार घरामागे एका प्रगणकाला काम करावे लागणार असल्याची माहिती डॉ. वल्लभ जोशी, जिल्हा पशसंवर्धन उपआयुक्त ठाणे, जिल्हा परिषदेचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. समीर तोडणकर यांनी दिली.

१९१९-२० पासून देशात वेळोवेळी पशुगणना करण्यात आली. तेव्हापासून ही जनगणना दर ५ वर्षांनी एकदा केली जाते. राज्य सरकार आणि केंद्रशासित प्रदेशांच्या सहकार्याने मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागाने आतापर्यंत अशा २० जनगणना केल्या आहेत. पशुगणना केवळ धोरणकर्त्यांसाठीच नाही तर शेतकरी, व्यापारी, उद्योजक, दुग्धउद्योग, सर्वसामान्यांसाठीही फायदेशीर ठरते. यामुळे पशुधनासाठी धोरण आखणे सोप्पे जाते. २०वी पशुगणना २०१९ मध्ये झाली होती आणि आता ही गणना देशभरात होत असताना ठाणे जिल्ह्यात देखील केली जाणार आहे.

राज्य सरकारचा पशुसंवर्धन विभाग आणि महापालिकेतर्फे गणना करताना महापालिकेकडून प्रगणक आणि पर्यवेक्षकांच्या नेमणुकाही करण्यात आल्या आहेत. तसेच या क्षेत्राशी निगडीत संस्थाचीही मदत घेण्यात येत आहे.

पशुगणना करण्यासाठी ग्रामीण भागात ७२ प्रगणक, १४ पर्यवेक्षक असून एकूण ८६ कर्मचारी तसेच शहरी भागात २५६ प्रगणक, ४७ पर्यवेक्षक असून एकूण ३०३ कर्मचारी कार्यरत असणार आहेत. चार हजार घरांमागे एका प्रगणकाला गणना करण्याची जबाबदारी असेल. तर दहा प्रगणकांमागे एक पर्यवेक्षक काम पाहणार आहे. मोबाइल पमार्फत ही गणना होणार असून तो तीन महिने चालेल.

# वसई, वाड्यात अवैध खैरतस्करी रोखली

वाडा : मुंबई-अहमदाबाद महामार्गावर दमण बनावटीच्या दारूसह गुटखा वाहतूक जोमात सुरू असतानाच आता वसई पूर्वेत लाखोंची खैर तस्करी सुरू असल्याचे उघड झाले आहे. वन विभागाने पाठलाग करत केलेल्या कारवाईत खैराचे ओंडके भरलेली दोन वाहने ताब्यात घेतली आहेत.

वनविकास महामंडळ मांडवी, शिरसाड व गणेशपुरी कार्यकेंद्रातील कर्मचार्यांना यश मिळाले आहे. सापळा रचून खैरांच्या सोलीव ओंडक्यांनी भरलेली दोन वाहने या चार दिवसांत वेगवेगळ्या कारवाईत मुद्देमालासह ताब्यात घेतली आहेत. दरम्यान वाडा तालुक्यातील जंगलावर हल्ला चढविणार्या तस्करांच्या मुसक्या कंचाड वन विभागाने बांधल्या असून खैराच्या सोलीव ओंडक्यांची वाहतूक करणार्या टेम्पो व कारला जप्त करण्यात यश आले.

याबाबत सविस्तर माहिती अशी आहे की, विरारफाटा येथील वनविकास महामंडळाच्या शिरसाड आणि मांडवी व गणेशपुरीच्या वनपरिक्षेत्रातील अधिकार्यांना २६ व २७ ऑगस्ट रोजी त्यांच्या कार्यक्षेत्रात तसेच मुंबई -अहमदाबाद महामार्गावरून वनोपज मालाची तस्करी होणार असल्याची खबर त्यांच्या गुप्त सूत्रांकडून मिळाली होती. त्यानुसार वनपरिक्षेत्र अधिकारी आर.एम. सोनवणे,वनपाल के.व्ही.सानप, एन.के. डफडे, एम.बी.सोलंकी, जे.डी.धनगर, आर डी चव्हाण, यु.जी. बतुलवार वनरक्षक, एम.यु.जिगुरे, आर.डी.राठोड, एस.डी. गायकवाड, पी.डी.खोसरे, एस.जी.सनवारे, बी.एस.नवघरे व हेमंत भोये यांनी महामार्गावर तसेच संशयित व मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी गस्त सुरू केली होती. तसेच दोन ठिकाणी सापळा रचून संशयित वाहनाची टेहाळणी करण्याकरिता दबा धरून बसून बसले होते.

यातील पहिल्या घटनेत २६ ऑगस्ट रोजी भाताणे वनपरिमंडळ वनहददी लगतच्या गावापाड्यातील रस्त्यालगत कर्मचाऱ्यांना अज्ञात वाहन येतांना दिसले. त्यास हातवारे व विजेरीच्या सहाय्याने थांबिण्याचा प्रयन्त केला. रस्त्यात वाहन सोडून अंधाराचा फायदा घेऊन वाहन चालक साथीदारासह जंगलात पसार झाले. मात्र त्या वाहनाची तपासणी केली असता त्यात खैरांचे सोलीव ७८ नग घ.मी.१.०२० आढळून आले. त्यांची किंमत ८५ हजार तसेच टेम्पो वाहन किंमत ७ लाख असा मिळून ७ लाख ८५ हजारांचा मुद्देमान जप्त करण्यात आला. तर दुसर्या घटनेत २७ ऑगस्ट रोजी महामार्गावर सापळा रचलेल्या ठिकाणी अनेक संशयित वाहनांना थांबवले परंतु मध्यरात्री उलटूनही तस्करी होत असलेले वाहन न सापडल्याने त्यांचं हिरमोड झाला. परंतु गुप्त खबर ही पक्की असल्याने त्यांनी प्रयत्न सुरूच ठेवले होते.

मुरबाडमधील दुर्गम भागातील

# विद्यार्थ्यांनी गिरवले मूर्तीकामाचे धडे



ठाणे : ग्रामीण भागातील मुलांमध्ये कलात्मक दृष्टिकोन आणि कलेबद्दल आसक्ती आहे. मात्र, त्यांना मंच मिळत नाही. हा मंच मिळवून देण्यासाठीच ' कलासिद्धी' मुंबई आणि 'अर्थ' स्टुडिओ, संगम, मुरबाड - यांच्या संयुक्त विद्यमाने पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी शाडूच्या मातीपासून पर्यावरण पूरक गणेश मूर्ती बनविण्याची मोफत कार्यशाळा नुकतीच जिल्हा परिषद केंद्र शाळा, अस्कोट, संगम, तालुका मुरबाड, जिल्हा ठाणे, येथे आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेत पहिली ते आठवीतील जवळपास १०३ विद्यार्थी सहभागी झाले होते. केंद्र शाळेतील सुदर्शन पाटील, महेश शिंदे व मेघा पवार असे सर्व शिक्षकांचे आणि शाळेचे विश्वस्त सुरेश ठाकरे यांचे मोलाचे सहकार्य या कार्यशाळेला लाभले. शालेय स्तरावर अशा प्रकारची कार्यशाळा प्रथमच या विभागात आयोजित करण्यात आली होती. खास या कार्यशाळेसाठी मुंबईहून कलासिद्धी या संस्थेतर्फे अरुण आंबेरकर, उदय पटवर्धन, रेखा भिवंडीकर आणि अनिल लोंढे अशी नामांकित चित्रकार व शिल्पकार मंडळी, तर अर्थ स्टुडिओतर्फे सुनील पुजारी (चित्रकार) हे सहभागी झाले होते. या सर्वांनी अतिशय मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना या कार्यशाळेदरम्यान केले, सर्व विद्यार्थ्यांचा उत्साह वाखाणण्यासारखा होता, विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर आणि सुबक अशा गणेश मूर्ती घडविल्या, गणेश मूर्ती घडविण्यात विद्यार्थी एवढे रंगून गेले होते की कार्यशाळेचे चार तास केव्हा संपले हेही त्यांना कळले नाही.

# ठाणे गावदेवी मार्केट येथे २ अनधिकृत गाळे

## संजय वाघुले यांनी छेडले आंदोलन, भाजी मार्केट बंद



ठाणे : गावदेवी येथील भाजी मार्केट मध्ये १५५ अधिकृत गाळे आहेत, हे पूर्ण मार्केट अधिकृत आहे, पण काल रात्री बारा वाजता काही समाजकंटकांनी दोन अनधिकृत गाळे आणून तेथे बसवले, त्याचा निषेध करण्यासाठी आणि ते दोन्ही गाळे तेथून हटवण्यासाठी भाजपचे ठाणे जिल्हा अध्यक्ष संजय वाघुले तेथे उपोषण सुरु केले आहे. त्यांच्या बरोबर माजी नगरसेवक सुनेत जोशी, माजी नगरसेविका प्रतिभा मडवी, माजी नगरसेविका मृणाल पेंडसे, व भाजी मार्केट मधील गाळे धारक बसले होते, नगरसेविका प्रतिभा मडवी यांच्या नगरसेवक निधीतून दोन लाख रुपये खर्च करून या ठिकाणी ज्येष्ठ कट्टा बांधण्यात आला होता व त्या ठिकाणी चार बेंच ठेवण्यात आले होते, त्यातील दोन बेंच रातोरात काढून टाकण्यात आले, आणि त्या ठिकाणी दोन गाळे आणून ठेवण्यात आले, समोरच देवाचे मंदिर असून त्या साठी या कट्ट्याच्या वर दोन सिसिटीव्ही कॅमेरा लावण्यात आले होते, ते सुद्धा झाकून टाकण्यात आले होते, अगोदरच त्या समोरचारस्ता लहान आहे, त्यातच हे अनधिकृत गाळे आणून ठेवल्यामुळे अजून गर्दी होण्याची शक्यता आहे, त्यामुळे हे गाळे काढून टाकावेत अशी मागणी यावेळी वाघुले यांनी केली, या भाजी मार्केटच्या वरच नौपाडा प्रभाग समिती आहे, त्यांचे सुद्धा या अनधिकृत गाळयांकडे कडे लक्ष नाही, त्या मुळे हे अनधिकृत गाळे हटवण्याचे काम महानगर पालिकेने करायचे असते ते काम संजय वाघुले आणि सुनेत जोशी यांनी हातात हातोडा घेऊन केले.

अभिजीत पवार यांचे सामाजिक भान

# जखमी गोविंदावर केले स्वखर्चाने उपचार

ठाणे : कोट्यवधींच्या दहीहंडी उभारून प्रसिद्धी घेणाऱ्यांची संख्या वाढत आहे. मात्र, जखमी झालेल्या गोविंदांकडे ढुंकूनही पाहिले जात नाही. मात्र, डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या तालमीत घडलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते अभिजीत पवार यांनी सामाजिक भान ठेवून एका जखमी गोविंदावर ज्युपिटर हॉस्पीटलमध्ये स्वखर्चाने शस्त्रक्रिया करून घेतली. त्यामुळे त्यांचे कौतूक होत आहे.

ओम साई गोविंदा पथकात वरच्या थरावर चढणारा जिग्नेश तांबडे हा तरूण दहिहंडी फोडताना खाली पडला होता. त्यामध्ये त्याच्या हाताचे हाड मोडले होते. सुरूवातीला त्याला छत्रपती शिवाजीमहाराज रूग्णालयात नेण्यात आले. मात्र, तत्काळ शस्त्रक्रियेची गरज असतानाही १५ दिवसांनंतरची तारीख देण्यात आली. जिग्नेश याची आर्थिक परिस्थितीची जेमतेम असल्याने त्याला खासगी रुग्णालयात उपचार घेणे अशक्य होते. ही बाब अभिजीत पवार यांना समजताच त्यांनी तत्काळ छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालयात धाव घेऊन त्याचा स्वतःच्या जबाबदारीवर डिस्चार्ज करून घेतला अन् त्याला ज्युपिटर रूग्णालयात दाखल करून तत्काळ स्व खर्चाने शस्त्रक्रिया करून घेतली. काल त्याला रुग्णालयातून सुट्टी मिळाली. आता त्याची प्रकृती व्यवस्थित असून अभिजीत पवार यांनी दाखविलेल्या या सामाजिक उत्तदायित्वाचे परिसरात कौतूक होत आहे.



याबाबत अभिजीत पवार यांच्याशी संपर्क साधला असता, डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी दहीहंडीचा सण जागतिक स्तरावर नेला. त्यांनी गोविंदांना कधीच वाऱ्यावर सोडले नाही. गोविंदांची स्वतःच्या कुटुंबातील सदस्यांसारखी काळजी त्यांनी घेतली होती. आपण त्यांच्या शिकवणीवरच चालत आहोत. आपण फारसे काही वेगळे केले नाही. डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी आखून दिलेल्या मार्गावरच चालण्याचा प्रयत्न करीत आहोत, असे सांगितले.



# बेलापूर विभागातील ३ सोसायट्यांमध्ये 'प्लास्टिकमुक्त सोसायटी' विषयी जनजागृती

बेलापूर : स्वच्छतेप्रमाणेच पर्यावरणाला व मानवी जीवनाला घातक असणा-या प्लास्टिकपासून सर्वांना वाचविण्यासाठी प्लास्टिकचा वापर टाळण्याबाबत नवी मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात येत असून महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 'प्लास्टिकमुक्त सोसायटी' अभियान राबविले जात आहे.



या अंतर्गत आज बेलापूर विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी शशिकांत तांडेल यांच्या पुढाकारातून स्वच्छता अधिकारी सूर्यकांत म्हात्रे यांच्या सहयोगाने सेक्टर ३८ नेरूळ येथील केंद्रीय विहार सोसायटी, सेक्टर ४४ नेरूळ येथील गिरीराज सोसायटी व सेक्टर ११ सीबीडी बेलापूर येथील मरमेंट सोसायटी याठिकाणी स्वच्छतेसोबतच प्लास्टिकमुक्त सोसायटी विषयी जनजागृती करण्यात आली व तेथील रहिवाश्यांना प्रोत्साहित करण्यात आले.

येथे कचरा वर्गीकरण, कचरा प्रक्रिया प्रकल्प, थ्री आर चे महत्व, प्लास्टिकचे दुष्परिणाम याविषयी माहिती देऊन जागरूकता निर्माण करण्यात आली तसेच सूर्योदय बँकेच्या सीएसआर सहकार्यातून कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी मी प्लास्टिक पिशव्या व एकल वापराच्या प्लास्टिकचा वापर करणार नाही अशी सामुहिक शपथही ग्रहण करण्यात आली. यावर्षीचा गणेशोत्सव प्लास्टिकमुक्त साजरा करणेविषयी आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी यापूर्वीच आवाहन केले असून याबाबतही नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

# आ. महेंद्र दळवींवर बिनबुडाचे आरोप करण्याचा प्रयत्न : राजाभाई केणी

पेण : ग्रामस्थ व मुंबई मंडळ त्यांच्याकडून आमदार महेंद्रशेठ दळवी यांना समस्या सोडवण्यासाठी विनंती करण्यात आली तसेच ग्रामस्थांनी आमदार महेंद्रशेठ दळवी यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला हे बघून स्वतःची वाहवा करण्यासाठी पिंगळे हे आमदार महेंद्रशेठ दळवी आणि मानसीताई दळवी यांच्यावर बिनबुडाचे आरोप करत आहेत तर मानसीताई दळवी या ३५ वर्ष राजकारणात काम करत आहेत त्या सरपंच ते जिल्हापरिषद सदस्य झाल्या आणि पुढे त्यांच्या कर्तृत्वाच्या जोरावर मानसीताई दळवी या जिल्हापरिषदेच्या अध्यक्षा होणारच असा




विश्वास जिल्हाप्रमुख राजाभाई केणी यांनी बोलून दाखवला तसेच आमदार महेंद्रशेठ दळवी हे स्मशानभूमी व रस्त्याचा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करतील तसेच भूमिपूजनाला येतील असे राजाभाई केणी यांनी नवखार ग्रामस्थ व मुंबई मंडळ ग्रामस्थांना सांगितले.

यावेळी ग्रामस्थ प्रवीण ठाकूर, सुनील ठाकूर तुषार शेरमकर यांनी ही नवखार स्मशानभूमी जागेबाबत माहिती दिली.

यावेळी जिल्हाप्रमुख राजाभाई केणी, जिवन पाटील, स्वप्निल म्हात्रे, प्रवीण ठाकूर, तुषार शेरमकर, सुनील ठाकूर, अनंत शेरमकर गुरुजी, अमृत पाटील, चंद्रमोहन पाटील, पंचकमेटी, जालन पाटील तसेच नवखार ग्रामस्थ महिला, युवक उपस्थित होते.

'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' अभियानात

# बेलापूरसह नेरूळ व वाशी येथे 'डीप क्लिनींग ड्राईव्ह'

नवी मुंबई : स्वच्छ भारत मिशन अंतर्गत 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' अभियानांतर्गत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार सातत्याने विविध उपक्रम राबविले जात असून त्यामध्ये लोकसहभागावर भर दिला जात आहे.

या अनुषंगाने आज बेलापूर, नेरूळ व वाशी विभागात अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे, परिमंडळ १ उपआयुक्त सोमनाथ पोटरे यांच्या नियंत्रणाखाली विशेष सखोल स्वच्छता मोहीम अर्थात डीप क्लिनींग ड्राईव्ह राबविण्यात आले.

यामध्ये बेलापूर विभागात आम्र मार्ग येथे विशेष सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यामध्ये नवीन यांत्रिकी सफाई वाहनांचा वापर करण्यात आला. घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे यांच्या उपस्थितीत राबविण्यात आलेल्या या मोहीमेत महापालिका स्वच्छताकर्मीसह एनएसएसचे विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले होते. या अंतर्गत उरण हायवे व त्या बाजूच्या पदपाथच्या कडेला असलेले गवत काढण्यात आले तसेच प्लास्टिक, कागद, कापडाचे तुकडे असा कचरा गोळा करण्यात आला व परिसर स्वच्छता करण्यात आली. बेलापूर विभागाचे सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी शशिकांत तांडेल व स्वच्छता अधिकारी सूर्यकांत म्हात्रे यांच्या माध्यमातून सर्व स्वच्छता निरीक्षक व स्वच्छतामित्रांसह ही सखोल स्वच्छता मोहीम यशस्वीरित्या राबविण्यात आली.

अशाच प्रकारे नेरूळ विभाग कार्यालयामार्फत डी.वाय.पाटील स्टेडियम समोर सायन पनवेल हायवे तसेच एलपीनाका ते पुढारी प्रेस रोड आणि लगतची मोकळी जागा याठिकाणी सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. नेरूळ विभागाचे सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ. अमोल पालवे व स्वच्छता अधिकारी अरूण पाटील यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या या मोहीमेत महापालिका स्वच्छता निरीक्षक, पर्यवेक्षकांसह स्वच्छताकर्मी आणि एनएसएसचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी प्रोजेक्ट दिशा अंतर्गत जिल्हास्तरीय शिक्षण परिषदेचे आयोजन

# शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी तळमळीने काम करावे : रोहन घुगे

ठाणे (गणेश भोईटे) : मुलभूत भाषिक व गणितीय कौशल्य प्राप्त करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यासाठी जिल्हा परिषद मार्फत प्रोजेक्ट दिशा व्ही स्कूल पोर्टलद्वारे विद्यार्थ्यांची गुणवत्ता उंचावण्यासाठी कामकाज करण्यात येत आहे. यासाठी शिक्षण विभाग प्राथमिक व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था ठाणे यांच्या वतीने प्रोजेक्ट दिशा अंतर्गत जिल्हास्तरीय शिक्षण परिषद बी. जे. हायस्कूल, ठाणे येथे आयोजित करण्यात आले होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण परिषद आज घेण्यात आली.

'प्रोजेक्ट दिशा' या उपक्रमांतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांना स्वतः च्या मुलाप्रमाणे शिक्षण देणे गरजेचे आहे. शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता वाढवण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्नशील रहावे. आपल्या विद्यार्थ्यांचे कौशल्य लक्षात घेऊन त्यांच्या क्षमतेनुसार विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विद्यार्थी स्वयंप्रेरणेने शिकतील यासाठी कामकाज करावे. विविध उपक्रम राबवताना तांत्रिकदृष्ट्या मदत घेत आत्मीयतेने तळमळीने शिक्षकांनी काम करावे, असे मार्गदर्शन शिक्षण परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी उपस्थित सर्व शिक्षकांना केले. या विविध उपाययोजना करून शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता वाढवण्यासाठी शिक्षकांनी मोलाची कामगिरी करावी, अशी अपेक्षा देखील मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देत तसेच विद्यार्थ्यांची क्षमता लक्षात घेऊन शिक्षकांनी अध्ययन स्तर उंचावण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे शिक्षणाधिकारी प्राथमिक ललिता दहितुले यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी उप शिक्षणाधिकारी कुंदा पंडीत, उप शिक्षणाधिकारी वैशाली हिरडे, सर्व गट शिक्षणाधिकारी सर्व विस्तार अधिकारी शिक्षण, सर्व समन्वयक व्यवस्थापन, सर्व केंद्र प्रमुख व मोठ्या संख्येने शिक्षक उपलब्ध होते.

विद्यार्थ्यांना १ ली ते ४ थी पर्यंत शिक्षण उत्तम पद्धतीने देणे गरजेचे आहे यासाठी १०० टक्के शिक्षकांनी प्रयत्न करावे, असे आवाहन डायटचे प्राचार्य संजय वाघ यांनी केले.



शिक्षण विभागातील विविध कामासंदर्भात तसेच जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रात नाविन्यपूर्ण पद्धतींचा वापर करून विद्यार्थ्यांना वाचन, लेखन व गणित जलदगतीने करता यावे व शिक्षण क्षेत्रात बदल व्हावा यासाठी शिक्षण परिषद घेण्यात येत असून विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविण्यासाठी शिक्षकांनी गांभीर्याने कामकाज करावे, असे प्रास्ताविकेत उप शिक्षणाधिकारी कुंदा पंडीत यांनी सांगितले.

ओवेल्स ऑफ पीपल असोसिएशन या सामाजिक संस्थेच्या मदतीने व्ही स्कूल पोर्टलच्या माध्यमातून अध्ययन स्तर निश्चिती करणे याबाबतचा उपक्रम हाती घेण्यात आला असून तांत्रिक दृष्ट्या या अभियानासाठी प्रशिक्षण देण्यात आले आहे.

शिक्षक यांनी मराठी, गणित, इंग्रजी विषय शाळेत शिकवण्यासाठी घेतलेल्या उपक्रमाची माहिती देत विद्यार्थ्यांच्या अक्षर ओळख करून देण्यासाठी विविध पध्दतीचे अंमलबजावणी करण्यासाठी राबवलेल्या उपक्रमाची माहिती दिली. दिशा प्रकल्पाने माझ्या शाळेतील विद्यार्थ्यांना दिक्षा मिळाली, असे वर्गशिक्षक यांनी मत व्यक्त केले.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१